**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ______________________

   (Name) ______________________

2. (Signature) ______________________

   (Name) ______________________

**Answer Sheet No. :** ..............................................

(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | | |

(In figures as per admission card)

**Roll No.** ______________________

(In words)

**Test Booklet No.**

**J—3807**

**PAPER—II**

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Serial No. of the booklet should be entered in the Answer-sheets and the Serial No. of Answer Sheet should be entered on this Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ⬬ (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या उत्तर-पत्रक पर अंकित करें और उत्तर-पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ⬬ (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI
## PAPER – II
## मराठी
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty** (50) objective-type questions, each question carrying **two** (2) marks. Attempt **all** of them.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले पन्नास (50) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास दोन (2) गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

**1.** पंढरपूर येथील विठ्ठलदेवाचा शिलालेख कोणत्या शकातील आहे?

(A) शक १२१२

(B) शक ११११

(C) शक १२७०

(D) शक ११३५

**2.** खोलेश्वर याचा आंबे शिलालेख कोणत्या शकातील आहे?

(A) शक ११५०

(B) शक १२३३

(C) शक ११९९

(D) शक ११९५

**3.** काव्यरचना व शाहीर यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | खर्ड्याचे लढाईचा पोवाडा | (i) | सगनभाऊ |
| (b) | देशस्थितीचा पोवाडा | (ii) | प्रभाकर |
| (c) | पानपतचा पोवाडा | (iii) | रामजोशी |
| (d) | भला जन्म हा तुला लाभला | (iv) | परशराम |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (B) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (C) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (D) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

4. काव्यरचना व कवी यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आर्याभारत | (i) | रामदास |
| (b) | सुभद्राचंपू | (ii) | एकनाथ |
| (c) | आनंदलहरी | (iii) | मोरोपंत |
| (d) | आनंदवनभुवन | (iv) | निरंजनमाधव |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (B) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (C) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (D) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

5. रती, हास, विस्मय, करुणा हे काय आहेत ?

(A) व्यभिचारिभाव

(B) विभाव

(C) स्थायिभाव

(D) रस

6. 'बर्थ ऑफ ट्रॅजिडी' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) फ्रीड्रिख नीत्शे

(C) हेगेल

(D) शोपेनहॉर

7. भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे काव्य ही भूमिका वर्डस्वर्थची, तर काव्य म्हणजे भावनांपासून सुटका ही भूमिका टी.एस. इलियटची.

(A) विधानाचा पूर्वार्ध व उत्तरार्ध बरोबर

(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) विधानाचा पूर्वार्ध व उत्तरार्ध चूक

8. सिद्धान्त आणि साहित्यमीमांसक यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | स्वप्न सिद्धान्त | (i) | लाँजायनस |
| (b) | उदात्तता | (ii) | ॲरिस्टॉटल |
| (c) | समधातता | (iii) | फ्रॉइड |
| (d) | अनुकृती | (iv) | आय.ए. रिचर्डस् |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (B) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (C) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (D) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

9. भरताच्या नाट्यशास्त्रात किती अध्याय आहेत?

(A) बारा

(B) अठरा

(C) छत्तीस

(D) वीस

10. नाटके व नाटककार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मानापमान | (i) | मा.ना. जोशी |
| (b) | म्युनिसिपालीटी | (ii) | मो.ग. रांगणेकर |
| (c) | भ्रमाचा भोपळा | (iii) | कृ.प्र. खाडिलकर |
| (d) | कुलवधू | (iv) | प्र.के. अत्रे |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (B) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (C) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (D) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

11. ‘पानपतावर सव्वा लाख बांगडी फुटली’ या उद्‌गाराचा अर्थ शब्दशः केला जात नाही.

कारण –

(A) पानपतावर सव्वा लाख बांगड्या कुठून येणार?

(B) पानपतावर सगळे लढवय्ये पुरुष होते.

(C) भाषेच्या ठिकाणी लक्षणा शक्ती असते, ती लाक्षणिक अर्थ सुचविते.

(D) पानपतावर मराठी भाषा बोलली जात नव्हती.

12. ‘‘रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम्’’ अशी काव्याची व्याख्या जगन्नाथाने केली.

कारण – त्याला रमणीय गोष्टी फार आवडत.

(A) विधान आणि कारण दोन्ही चूक आहेत.

(B) विधान बरोबर परंतु कारण चुकले आहे.

(C) विधान चूक परंतु कारण बरोबर आहे.

(D) विधान आणि कारण दोन्ही बरोबर आहेत.

13. विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात असे जरी ठरवले तरी काही ठिकाणी त्या अर्थावरून मानाव्या लागतात.

(A) द्वितीया व चतुर्थी विभक्तींचे प्रत्यय एकसारखे आहेत.

(B) प्रत्ययांना अर्थ असतोच.

(C) संस्कृतात तसे करतात.

(D) भाषेत शेवटी अर्थालाच महत्त्व असते.

14. साने गुरुजी जसे उत्तम कादंबरीकार होते तसेच ते उत्तम कवीही होते.

(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) विधानाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध दोन्ही बरोबर

(C) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) विधानाचा पूर्वार्ध व उत्तरार्ध दोन्ही चूक

**15.** महानुभाव ग्रंथकार आणि त्यांचे ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा :

| | ***ग्रंथकार*** | | ***ग्रंथ*** |
|---|---|---|---|
| (a) | बाइदेवव्यास | (i) | मूर्तिप्रकाश |
| (b) | नरेन्द्र | (ii) | श्रीगोविंदप्रभुचरित्र |
| (c) | केशिराजव्यास | (iii) | पूजावसर |
| (d) | म्हाइंभट | (iv) | रुक्मिणीस्वयंवर |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (B) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (C) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (D) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

**16.** संतवचने व संत यांच्या जोड्या जुळवा :

| | ***संतवचन*** | | ***संत*** |
|---|---|---|---|
| (a) | अमृताहुनि गोड नाम तुझे देवा | (i) | ज्ञानदेव |
| (b) | कारे भुललासि वरलिया रंगा | (ii) | रामदास |
| (c) | जो जें वांछिल तो तें लाहो प्राणिजात | (iii) | नामदेव |
| (d) | तुजविण शिण होतो धांवरे धांव आता | (iv) | चोखामेळा |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (B) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (C) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (D) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

**17.** 'हरामखोर' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे ?

(A) अरबी

(B) फार्सी

(C) उर्दू

(D) कन्नड

**18.** वैद्य–गुणे वाद हा कोणत्या निमित्ताने झाला ?

(A) पुरोगामी वाङ्‌मयाच्या चर्चेच्या संदर्भात.

(B) साहित्याच्या प्रयोजनांची मीमांसा करताना.

(C) मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधीची मांडणी करताना.

(D) काव्यनिर्मितीची कारणे शोधताना.

**19.** 'मले', 'तुले', 'पोराले', 'रामाले' अशी शब्दरूपे कोणत्या बोलीत आढळतात ?

(A) अहिराणी

(B) वऱ्हाडी

(C) डांगी

(D) हळबी

**20.** काव्योक्ती आणि कवी यांच्या जोड्या जुळवा :

| | ***काव्योक्ती*** | | ***कवी*** |
|---|---|---|---|
| (a) | विक्रम काही करा चला तर | (i) | बा.सी. मर्ढेकर |
| (b) | ह्या नच मुंग्या हीच माणसे | (ii) | ग्रेस |
| (c) | भ्रांत तुम्हां कां पडे | (iii) | केशवसुत |
| (d) | पाऊस कधीचा पडतो | (iv) | माधव जूलियन |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (B) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (C) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (D) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

**21.** 'झाले मी वेसवा' असे नि:संग उद्‌गार काढणारी संत कवयित्री कोण ?

(A) कान्हुपात्रा

(B) लिंबाई

(C) जनाबाई

(D) वेणाबाई

22. पुढील नाटकांची कालानुक्रमे मांडणी करा.

a. सोन्याचा कळस

b. तो मी नव्हेच

c. एकच प्याला

d. वाडा चिरेबंदी

(A) b c a d

(B) b a c d

(C) c a b d

(D) c d a b

23. परशुरामपंततात्या गोडबोले यांनी संपादित केलेल्या काव्यसंग्रहाचे नाव काय?

(A) नवे नवनीत

(B) नवनीत

(C) गज्जलांजली

(D) रघुवंश

24. पूरक विनियोग, स्वैरविनियोग, वैधर्म्ययुक्त विनियोग या तत्त्वांच्या आधारे कोणाची निश्चिती करता येते?

(A) पवित्र

(B) सामान्यरूप

(C) स्वनिम

(D) बलाघात

25. पुढील बखरींचा कालानुक्रम लावा.

a. सप्तप्रकरणात्मकचरित्र

b. सभासदाची बखर

c. होळकरांची कैफियत

d. पेशवेबखर

(A) b d c a

(B) a d c b

(C) d c a b

(D) b a d c

26. 'मराठी बखर' या ग्रंथाचे लेखक कोण?

(A) डॉ. बापूजी संकपाळ

(B) र. वि. हेरवाडकर

(C) वि. का. राजवाडे

(D) गो.स. सरदेसाई

27. साहित्यमीमांसक आणि ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा :

| ***साहित्यमीमांसक*** | | ***ग्रंथ*** | |
|---|---|---|---|
| (a) | भामह | (i) | काव्यमीमांसा |
| (b) | दण्डी | (ii) | ध्वन्यालोक |
| (c) | आनंदवर्धन | (iii) | काव्यालंकार |
| (d) | राजशेखर | (iv) | काव्यादर्श |
| | | (v) | काव्यप्रकाश |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (B) | (iv) | (iii) | (i) | (v) |
| (C) | (v) | (i) | (ii) | (iii) |
| (D) | (ii) | (iii) | (v) | (i) |

28. 'महानुभाव तत्त्वज्ञान' आणि 'महानुभावांचा आचारधर्म' या ग्रंथांचे लेखक कोण?

(A) शं.गो. तुळपुळे

(B) वि.भि. कोलते

(C) ह.ना. नेने

(D) य. खु. देशपांडे

29. पुढीलपैकी कोणी ललितगद्यलेखन केले नाही?

(A) मंगेश पाडगावकर

(B) दुर्गा भागवत

(C) आनंद यादव

(D) भालचंद्र नेमाडे

30. ‘कवितारती’ या नियतकालिकाचे संपादक कोण?

(A) पुरुषोत्तम पाटील

(B) गंगाधर पाटील

(C) म.सु. पाटील

(D) गो. तु. पाटील

31. पुढीलपैकी कोण लोकसाहित्याचे अभ्यासक नव्हेत?

(A) इरावती कर्वे

(B) साने गुरुजी

(C) सरोजिनी बाबर

(D) रा.चिं. ढेरे

32. ‘नवीन भावनानिष्ठ समतानता’ हा शब्दप्रयोग मराठी समीक्षेत सर्वप्रथम कोणी योजला?

(A) वा.म. जोशी

(B) प्रभाकर पाध्ये

(C) बा.सी. मर्ढेकर

(D) रा.भा. पाटणकर

33. रा.भा. पाटणकर यांनी ‘द्विध्रुवात्मकतेचा सिद्धान्त’ मांडला तसेच ‘अपूर्णक्रांती’ची मीमांसाही केली.

(A) पूवार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) उत्तरार्ध चूक, पूर्वार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

34. पुढील आत्मकथने कालक्रमानुसार लिहा.

a. तराळ-अंतराळ

b. बलुतं

c. कोल्हाट्याचं पोर

d. अक्करमाशी

(A) b a d c

(B) a b c d

(C) b c a d

(D) d a c b

35. 'कवी, काव्य आणि काव्यरती' या निबंधाचे लेखक कोण?

(A) पुरुषोत्तम पाटील

(B) रा.श्री. जोग

(C) गो. ग. आगरकर

(D) श्री.व्यं. केतकर

36. मराठीतील पहिला विनोदी निबंध कोणता?

(A) टिळक बाळंत झाले

(B) साक्षीदार

(C) स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग

(D) मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास

37. स्त्रीलिखित पहिली मराठी कादंबरी कोणती?

(A) गुलबकावली

(B) पहाटेपूर्वीचा काळोख

(C) चन्द्रप्रभाविरहवर्णन

(D) हिंदोळ्यावर

38. ‘वर्षा’, ‘तोच चंद्रमा’, ‘रूपसी’, ‘गोंदण’ हे काव्यसंग्रह कोणाचे ?

(A) ग्रेस

(B) शांता शेळके

(C) पद्मा गोळे

(D) अरुणा ढेरे

39. ‘कारणानां अनेकता’ ही भूमिका कोणी मांडली ?

(A) श्री.के. क्षीरसागर

(B) बा. अ. भिडे

(C) वा.म. जोशी

(D) द. के. केळकर

40. कॅथॉर्सिसची उपपत्ती कोणी मांडली ?

(A) शि.गो. भावे

(B) ॲरिस्टॉटल

(C) म.मा. आळतेकर

(D) ए.सी. ब्रॅडली

41. केवळ समीक्षेला वाहिलेले मराठी नियतकालिक कोणते ?

(A) छंद

(B) चित्रमयजगत

(C) विविधज्ञानविस्तार

(D) आलोचना

42. एकोणिसाव्या शतकात सिद्ध झालेला सर्वात मोठा मराठी शब्दकोश कोणाचा?

(A) सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

(B) महादेवशास्त्री जोशी

(C) मोल्सवर्थ कॅण्डी

(D) प्र.न. जोशी

43. 'कशी या त्यजु पदाला नाथा' हे पद कोणत्या नाटकातील आहे?

(A) एकच प्याला

(B) भावबंधन

(C) स्वयंवर

(D) पंडितराज जगन्नाथ

44. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनाच्या नियमानुसार बरोबर आहे?

(A) शार्दूलविक्रीडीत

(B) शार्दुलविक्रीडित

(C) शार्दूलवीक्रीडित

(D) शार्दुलवीक्रीडीत

45. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे सूत्र कोठे आढळते?

(A) आज्ञापत्र

(B) होळकरांची थैली

(C) महाभारत शांतीपर्व

(D) दासबोध

*पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा -*

बांधिलकीची संकल्पना लेखक सापेक्ष असून साहित्य आणि रसिक या अन्य दोन घटकांचा बांधिलकीशी संबध दूरान्वयाचा ठरतो. लेखकाच्या बांधिलकीची संकल्पना व्यास-होमर यांच्यापासून सर्व मानवी समाजांच्या वाङ्मयीन संस्कृतींमध्ये निरनिराळ्या स्वरूपात आढळते. मानवी समाज आजपर्यंतसुद्धा वांशिक, धार्मिक, राष्ट्रीय वगैरे बऱ्यावाईट अशास्त्रीय तत्त्वांवर संघटित होऊन टिकून आहेत. त्या सर्वच तत्त्वांशी त्या त्या देशांतील लेखकांची बांधिलकी होती. म्हणजे बांधिलकीची संकल्पना वैश्विक असली तरी देशकालपरत्वे बदलणारी आहे हे जागतिक साहित्याच्या इतिहासावरून लक्षात येते. दोन भिन्न भाषासमूहांमधील लेखकांच्या बांधिलकीचे सामाजिक संदर्भ बदलते असल्यामुळे बांधिलकीचे वैश्विक स्वरूप सिद्ध करणेही कठीण असते. बांधिलकी हे स्वायत्त तत्त्व ठरु शकेल असे वाटत नाही. निकृष्ट दर्जाच्या प्रचारकी साहित्यावरून बांधिलकी हे सौंदर्यशास्त्रीय तत्त्वांच्या विरोधात काम करणारे तत्त्व आहे असेही म्हणता येईल. परंतु बांधिलकी नसलेल्या लेखंकाचे साहित्य मात्र हटकून निकृष्ट असते असे म्हणता येते. साहित्य हे समूह-मनाच्या अंत:स्तरावरचे विनिमयाचे साधन असल्याने बांधिलकीला सामूहिक म्हणजे सामाजिक संदर्भ आपोआपच प्राप्त झालेले असतात. ज्या साहित्यकृतीत मनामनाला बांधणारे हे तत्त्व नसते ती साहित्यकृती निव्वळ शब्दांचा डोलारा असतो. भाषेच्या समूहजीवनसापेक्षतेचा स्पर्श अशा साहित्याला होत नाही.

**46.** मानवी समाज कोणत्या तत्त्वांच्या आधारे टिकून आहे?

(A) अर्थव्यवस्थेच्या आधारे

(B) वांशिक, धार्मिक, राष्ट्रीय इत्यादी तत्त्वांवर

(C) स्त्री-पुरुष संबंधावर

(D) राज्यव्यवस्थेच्या आधारे

**47.** बांधिलकीचे वैश्विक स्वरूप सिद्ध करणे कठीण का आहे?

(A) साहित्य हे देश-काल आणि भाषा या घटकांच्या सापेक्ष असते म्हणून

(B) बांधिलकीचा नेमका अर्थ स्पष्ट होत नाही म्हणून

(C) वैश्विकतेची संकल्पना संदिग्ध आहे म्हणून

(D) बांधिलकी हा समाज व्यवस्थेशी संबंधित विषय आहे म्हणून

**48.** बांधिलकी ही सौंदर्यशास्त्रीय तत्त्वांच्या विरोधी आहे असे कशाच्या आधारे म्हणता येते ?

(A) सौंदर्यशास्त्रीय घटकांच्या आधारे म्हणता येते.

(B) बांधिलकीच्या कारणांच्या आधारे म्हणता येते.

(C) निकृष्ट दर्जाच्या प्रचारकी साहित्याच्या आधारे म्हणता येते.

(D) साहित्यविमर्शकांनी घेतलेल्या भूमिकांच्या आधारे म्हणता येते.

**49.** साहित्याला सामाजिक संदर्भ कशामुळे प्राप्त होतात ?

(A) साहित्याचा समाजशास्त्राशी अतूट संबंध असल्यामुळे

(B) वाचक सामाजिक दृष्टिकोणातून साहित्याचे वाचन करीत असल्यामुळे.

(C) साहित्य हे व्यक्तिगत जीवनाशी संबंधित असल्यामुळे.

(D) साहित्य हा समूहमनाच्या अंत:स्तरावरील व्यापार असल्यामुळे.

**50.** कोणती साहित्यकृती निव्वळ शब्दांचा डोलारा असते ?

(A) सामाजिक बांधिलकी नसलेली.

(B) वाचकांच्या अभिरुचीचा विचार न करणारी.

(C) सुरम्य शब्दांचा खेळ असणारी.

(D) प्रसिद्धीच्या हव्यासातून लिहिलेली.

- o O o -

**Space For Rough Work**